(तीन) सदर इरादा पत्राचा, सी.बी.एस.ई. आय.सी.एस.ई./ आय.जी.सी.एस.ई. / आय.बी., इत्यादी मंडळांच्या संलग्नतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र म्हणून वापर करता येणार नाही.

(चार) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ आणि अधिनियमान्वये व नियमांन्वये शासनाने वेळोवेळी दिलेले निदेश, यांमध्ये विहीत केल्याप्रमाणे, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, पायाभूत व भौतिक सुविधा (वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल सुविधा, प्राचार्य व कर्मचारी वर्ग कक्ष, ग्रंथालय, प्रयोगशाळा, इत्यादींसारख्या) याबाबतची मानके, अटी व शर्ती यांचे अनुपालन करणे अनिवार्य असेल.

(पाच) वर नमूद केलेल्या सुविधांचे अनुपालन केल्यानंतर, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, संबंधित जिल्ह्याच्या क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाकडे मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करणे, ही संस्थेची किंवा न्यासाची किंवा कंपनीची जबाबदारी असेल.

(सहा) जर १८ महिन्यांच्या आत, मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करण्यात शाळा व्यवस्थापन अपयशी ठरत असेल तर, इरादा पत्र रद्द होईल. इरादा पत्राचा कालावधी, कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाऊ शकणार नाही.

(सात) इरादा पत्र दिल्यानंतर, प्रस्तावित शाळेचे ठिकाण बदलता येणार नाही. जर व्यवस्थापनाने, शासनाने मंजूर केलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणच्या मान्यता पत्रासाठी अर्ज केला असेल तर, इरादा पत्र रद्द होईल.

(आठ) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरून, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले इरादा पत्र रद्द करू शकेल.

(नऊ) सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने अधिनियमाच्या" अनुसूची ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम व्यवस्थापन आणि संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरित्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवणे आवश्यक राहील.

(प्रदिप पडोळे)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. विभागीय शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे.
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
६. निवड नस्ती एसएम-२. (५२८/२०२३)

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र४४७.,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई .४०० ०३२ -
Email ID: sm२.sesd-mh@gov.in
दूरध्वनी क्र:-


क्रमांक : एसएफएस-१०२३/प्र.क्र.५२८/एसएम-२

दिनांक : ३० ऑगस्ट, २०२४.

# मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
**सेंट लॉरेन्स एज्युकेशन ट्रस्ट, सिडको, औरंगाबाद.**

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**सेंट लॉरेन्स एज्युकेशन ट्रस्ट, सिडको, औरंगाबाद संचलित केंब्रीज इंटरनॅशनल स्कूल, गट क्र. ८६०, बीजेएस कॉलेजजवळ, बाकोरी रोड, ता. वाघोली, जि.पुणे. ४१२२०७**

संदर्भ - इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.५२८/एसएम-२, दि.३०.१०.२०२३.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व वित्तियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **सेंट लॉरेन्स एज्युकेशन ट्रस्ट, सिडको, औरंगाबाद** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **केंब्रीज इंटरनॅशनल स्कूल, गट क्र. ८६०, बीजेएस कॉलेजजवळ, बाकोरी रोड, ता. वाघोली, जि. पुणे. (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ली ते इ.१२वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, सी.बी.एस.ई.)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **सेंट लॉरेन्स एज्युकेशन ट्रस्ट, सिडको, औरंगाबाद संचलित केंब्रीज इंटरनॅशनल स्कूल, गट क्र. ८६०, बीजेएस कॉलेजजवळ, बाकोरी रोड, ता. वाघोली, जि. पुणे. (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ली ते इ.१२वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, सी.बी.एस.ई.)** या स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटी व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटी व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

**३. अटी व शर्ती :-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.